CMYK

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ४ थे ● अंक १४६ ● बुधवार, दि. ०४ सप्टेंबर २०२४ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

●Beed(Maharashtra)●Year4●Issue146●Wednesday,04September2024●RNI-MAHMAR/2021/80074●Post:Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24●Page1●Pages4●Price3Rs.




दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज । बीड । परभणी । छत्रपती संभाजीनगर । जालना । लातूर । धाराशिव । हिंगोली । नांदेड । नगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




बीड ● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# धनंजय मुंडे पूरग्रस्त परळीकरांच्या भेटीला

● पुरग्रस्तांची भेट घेत नुकसानीचे पंचनामे करण्याचे निर्देश; प्रशासनास तातडीने मदतीचे निर्देश
● घरात पाणी शिरलेल्या नागरिकांच्या भोजनाची नाथ प्रतिष्ठान करणार व्यवस्था






**परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी आज परळी शहरात सोमवारी झालेल्या पावसाने पुराचे पाणी शिरलेल्या विविध भागांमध्ये भेटी देऊन झालेल्या नुकसानीची पाहणी केली. पूरग्रस्त नागरिकांना भेटी देत चर्चा करून धनंजय मुंडे यांनी नागरिकांना दिलासा दिला. यावेळी पुरामुळे घरात पाणी शिरून झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनास दिले.

मागील दोन दिवसात झालेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील सरस्वती नदीस मंगळवारी सकाळी पूर येऊन नदीकाठच्या अनेक वस्त्यांमधील घरामध्ये पाणी शिरले होते. अंबेवेस भागासह अनेक गल्लीत पाणी शिरले होते. या पाण्यातून मार्ग काढीत राज्याचे कृषिमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी मंगळवारी दुपारी शहरातील पूरग्रस्त भागात भेट देऊन तेथील नुकसानग्रस्त नागरिकांची कैफियत ऐकून घेतली व नगरपालिका प्रशासनास स्वच्छता करून व तेथील नागरिकांचे प्रश्न सोडविण्याच्या सूचना केल्या.

घरात पाणी शिरून धन-धान्याचे नुकसान झालेल्या नागरिकांना तहसील मार्फत तात्काळ आपत्ती प्रतिसाद निधी देण्याची कार्यवाही करणे त्याचबरोबर नाथ प्रतिष्ठान च्या वतीने घरात-संसारात पाणी शिरलेल्या नागरिकांच्या भोजनाची व्यवस्था करण्याच्या सूचनाही धनंजय मुंडे यांनी दिल्या आहेत.

यावेळी त्यांच्यासोबत परळीचे उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर नगरपालिकेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे, नायब तहसीलदार बाबुराव रुपनर, नगरपालिकेचे उपमुख्यअधिकारी संतोष रोडे, रा.कॉ.चे तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके, माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख, श्रीकृष्ण कराड, अनंत इंगळे , राहुल ताटे,तखी खान आदी उपस्थित होते. शहरातील नरहरी मंदिर , गंगासागर , खुदबेनगर ,इंदिरानगर ,रहिमत नगर ,मिलिंद नगर भिमानगर, बरकत नगर ,शाही फंक्शन हॉल, आंबेवेस परिसरास भेट देवून तेथील नुकसानग्रस्त भागाची पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी पाहणी केली. नुकसानग्रस्त भागात प्रशासनाचे पथक सर्वे करीत आहे अशी माहिती उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर यांनी दिली. त्यानंतर धनंजय मुंडे हे परळी-अंबाजोगाई तालुक्यातील पावसाने झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी रवाना झाले होते.

## ◆ थोडक्यात...

### पांढरवाडीत दिवसा खूण
### तलवाडा पोलीस ठाणे यांनी वेळीच लक्ष न दिल्याने दिवसा खुण ?



**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस ठाणे हद्दीतील पांढरवाडी (रामपुरी) गावामध्ये मागील भांडणाची कुरापत काढून गावातीलच लोकांनी शेतात जात असताना एकट्याला पाहून बालाजी भगवान घरबुडे वय २६ वर्षे या तरुणावर आज दिनांक ३ सप्टेंबर रोजी दुपारच्या वेळी पांढरवाडी गावातच पाच, सहा लोकांनी हल्ला करत, सपासप वार केल्याने बालाजी घरबुडे यांचा मृत्यू झाला. हल्ला झाल्यावर उपचारासाठी औरंगाबाद येथे रुग्णालयात उपचारासाठी घेऊन जात असताना रस्त्यातच बालाजी घरगुडे यांचा मृत्यू झाल्याने त्यांना बीड येथील पोलीस अधीक्षक कार्यालय समोर प्रेत ठेवण्यासाठी कुटुंबातील सर्व सदस्यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या गेटवर गेले असता खबरदारी म्हणून पोलीस अधीक्षक कार्यालयाचे गेट बंद करण्यात आले. बालाजी घरबुडे हे लॉ कॉलेज औरंगाबाद येथे शिक्षण घेत होता. पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर मागील दोन तासपासून आक्रोशी व्यक्त करत पोलीस प्रशासन विषयी संताप व्यक्त केला. मागील दोन महिन्यापूर्वीच तलवाडा पोलीस ठाणे व बीड पोलीस अधीक्षक कार्यालय येथे निवेदन देऊन आरोपींना अटक करावी अशी मागणी केली होती. परंतु तलवाडा पोलीस ठाणे पोलिसांनी त्यांना अटक व कारवाई न केल्यामुळेच आजचा खून झाल्याचे कुटुंबाने आरोप केला आहे. पोलीस अधीक्षक कार्यालय समोर दोन तासापासून कुटुंबातील सर्व आक्रोश करत आरोपींना तात्काळ अटक करून फाशी देण्यात यावी अशी मागणी करत आहेत. आरोपींना अटक केल्याशिवाय प्रेत ताब्यात घेणार नाहीत असा पवित्रा मोहित कुटुंबाने घेतल्याने पोलीस अधीक्षक कार्यालसमोर जमावाने गर्दी केली आहे .

### डॉ.योगेश क्षीरसागरांनी बीड शहरातील नदीपात्रालगत भागाचा घेतला आढावा



**बीड । प्रतिनिधी**

शहरातील चांदणी चौक परिसरातील दगडी पुलासह नदीपात्राजवळील भागात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सोमवारी (दि.२) सकाळी ११ वाजता भेट दिली. यावेळी स्थानिक नागरिकांशी संवाद साधत पुरसदृश्य परिस्थितीचा आढावा घेतला. गत ४८ तासापासून जिल्हाभरात संततधार पाऊस सुरू आहे. बिंदुसरा नदीपात्राजवळील भागाला पुराचा धोका निर्माण झालेला आहे. याबाबत नगरपरिषद प्रशासनाशी संवाद साधत आपत्कालीन व्यवस्थेची माहिती घेतली. तसेच, त्यांना नागरिकांच्या संपर्कात राहण्याच्या सूचना दिल्या. यावेळी ज्येष्ठ नेते सादेक जमा, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अल्पसंख्याक सेलचे जिल्हाध्यक्ष इक्बाल शेख, युवती जिल्हाध्यक्ष प्रिया डोईफोडे, सय्यद इलियास, बिभीषण लांडगे, सरपंच अमोल बागलाने, अशोक वाघमारे, विनोद हातागळे, माजेद कुरेशी, साजेद जागीरदार, ए.वन.मुजीब, अमर विद्यागर, शुभम कुलथे, राहुल शिंदे, ज्ञानेश्वर राऊत आदी उपस्थित होते. याप्रसंगी नगरपरिषदेचे कर्मचारी, पोलीस अधिकारी उपस्थित होते.

# सरस्वती नदीच्या पुराचे पाणी शिरले नागरी वस्तीत

**●अनेक कुटुंबाचे संसार पाण्यात : ●परळी नगरपालिकेचा ढिसाळ कारभार उघड**

**परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी**

शहरात दोन दिवसापासून सतदार पाऊस सुरू असल्याने शहरातून वाहत जाणारी सरस्वती नदीला पूर आला आहे, यामुळे शहरातील नदीकाठच्या अनेक वस्त्यांमध्ये पाणी शिरले आहे. त्यामध्ये रहमत नगर,इंदिरानगर, कीर्ती नगर,गंगासागर नगर, भोई गल्ली, खुदबे नगर, पेठ मोहल्ला या नदीकाठच्या सकल भागात घरात पाच फुटापर्यंत पाणी शिरले आहे. नगरपालिकेच्या ढिसाळ कामाची ही सर्वात मोठी पावती परळीकरांना मिळाली आहे. या भागातील नागरिकांनी प्रशासनाला संपर्क केला असता कोणी फोन उचलले नाहीत व मदत पाठवली नाही.



नदीपात्राचे पाणी वस्त्यांमध्ये शिरल्यामुळे नागरिक आपला जीव मुठीत घेऊन इतरांच्या बिल्डिंग वर आसरा घेत आहे. यामुळे शहरातील सरस्वती नदीकाठच्या वस्त्यांमध्ये

... (उर्वरित पान २ वर)

# घोंगडी बैठकाचा सांगावा

**वडवणीतील मराठा सेवकांच्या गाव दौऱ्याला प्रचंड प्रतिसाद**



**वडवणी । प्रतिनिधी**

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत शुक्रवार दि.६ सप्टेंबर रोजी माजलगाव मतदार संघातील तेलगाव येथे सकाळी ११ वाजता घोंगडी बैठकीचे आयोजन करण्यात आले असून या बैठकीचे निमंत्रण

....(उर्वरित पान २ वर)

# जिल्ह्यात बस सेवा बंद !

**एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्याकडून विविध मागण्यासाठी संप; प्रवाशांचे मोठ्या प्रमाणावर हाल गणेश उत्सवाच्या तोंडावर संपामुळे नागरिक त्रस्त, सरकारने लवकरच निर्णय घ्यावा कर्मचाऱ्यांची मागणी**

**बीड । प्रतिनिधी**

राज्यभरातील एसटी महामंडळाच्या ११ कामगार संघटनांच्या कृती समितीनं मध्यरात्रीपासून संप पुकारला आहे. त्यामुळे एमएसआरटीसीच्या २५० बस डेपोपैकी ३५ बस सेवा पूर्णपणे ठप्प झाल्याची माहिती एसटी महामंडळाच्या प्रवक्त्यानं 'दिली. गणेशोत्सवासाठी अनेकांची सहकुटुंब मूळगावी जाण्याची घाई सुरु आहे. त्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे प्रवाशांना अडचणींना तोंड द्यावे लागत आहे.



गेल्या महिन्यात एसटी कामगार संयुक्त कृती समितीनं वेतनवाढीसह इतर समस्यांबाबत राज्य सरकारशी केलेली चर्चा निष्फळ ठरली. त्यानंतर एसटी कर्मचाऱ्यांनी वेतनवाढीच्या मागणीसाठी संप सुरू केला. राज्य सरकारच्या कर्मचाप्रमाणं वेतन देण्यात यावं, अशी एसटी एसटी कामगार संयुक्त कृती समितीची मागणी आहे. संपामुळे प्रवाशांचे हाल- एमएसआरटीसीच्या प्रवक्त्यानं सांगितलं की, संपाचा मुंबई विभागातील बस सेवेवर परिणाम झाला नाही. मुंबई विभागातील सर्व आगारांमध्ये बस सेवा सुरळीत सुरू आहे. परंतु ठाणे विभागातील बस सेवेवर अंशतः फटका बसला आहे. ठाण्यातील कल्याण, विठ्ठलवाडी डेपो पूर्णपणे बंद आहेत. पूर्व महाराष्ट्रात विदर्भ वगळता राज्यातील इतर भागातील बस सेवांवर या संपाचा परिणाम झाला आहे. पुणे आणि नाशिक जिल्ह्यात अनेक डेपो पूर्णपणे बंद असल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत.

▶ संपाचा प्रवाशांना मोठा फटका बसण्याची शक्यता - राज्यातील एसटी महामंडळात सुमारे १५,००० बस आणि ९०,००० कर्मचारी आहेत. तर एसटी बसमधून ६० लाखांहून अधिक प्रवासी वाहतूक करतात. गणेशोत्सवानिमित्त ३ ते ७ सप्टेंबर दरम्यान मुंबई, ठाणे आणि पालघर विभागातून ५,००० अतिरिक्त 'गणपती स्पेशल' बस चालविण्यात येणार आहेत. त्यामुळे स्पेशल बस सेवेलादेखील संपाचा फटका बसण्याची शक्यता

...(उर्वरित पान २ वर)

# आमदार नितेश राणे यांनी मुस्लीम समाजाबद्दल केलेल्या वादग्रस्त विधाना केल्यामुळे गुन्हा दाखल करा : बीड शहर मुस्लिम समाज

**बीड । प्रतिनिधी**

नितेश राणे यांनी भाषणात मुस्लिम समाजाला टार्गेट करत मुस्लिम समाजाविषयी देश निर्माण करणाऱ्या वक्तव्य केल्यामुळे राज्यात त्याच्याविरोधात कारवाई करण्याच्या मागण्या होत आहेत बीड सर मुस्लिम समाजाच्या वतीने गुन्हा दाखल करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, BJP आमदार नितेश राणे हा नेहमी मुस्लीम, मराठा, पोलीस यांच्या बाबत नकारात्मक विधाने करीत आहे. अहमदनगर येथे झालेल्या बैठकीत आ. राणे याने मुस्लीमांना मस्जीमध्ये घुसून मारू असे वादग्रस्त विधाने नेहमी करत असतो त्याने विधानसभा निवडणुक समोर ठेऊन हिंदू-मुस्लिम दंगे घडवायचे हे यांचे नियोजन आहे.



तरी ह्या राणे कुटूंबाचा बंदोबस्त पोलीस प्रशासन व महाराष्ट्र शासनाने करावा परंतु असे समजण्यास येते की, याच्यामागे मोठी राजकीय जातीवादी शक्ती तर नाही ना कारण तो कधी पोलीसा विरोधात, कधी मराठा समाजाच्या विरोधात तर कधी मुस्लीम समाजाच्या विरोधात.तरी महेरबानी साहेबांनी ह्या वाचाळवीर इगझ आमदाराला जेलची हवा दाखवावी असे निवेदन देण्यात आले आहे. निवेदन देतानां अड जावेद भाई अड पशा भाई अड सलीम भाई खुर्शीद आलम सहाब राजुभाऊ मोहाले रईस सर खदीर भाई नय्युम भाई नसिर खान सलीम शेख जमिर शेख अनवर भाई सिराज दादा असलम भाई मोसिन शेख जावेद पठान अमर मिर्जा आदी उपस्थित होते.

# दिलासादायक:अमृत योजना कायम ठेवून ब्राह्मण समाजासाठी लवकरच भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ होणार !

**●उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष बैठकीत दिले ब्राह्मण समाजाला आश्वासन: बाजीराव भैय्या धर्माधिकारी**

**मुंबई । प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षापासून ब्राह्मण समाजाच्या जिव्हाळ्याच्या मागण्यांसाठी विविध स्तरातून सरकार दरबारी पाठपुरावा केला जात आहे. यामध्ये प्रामुख्याने ब्राह्मण समाजासाठी भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ निर्माण करावे ही मागणी



लावून धरण्यात आलेली आहे. राज्याची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज या संदर्भाने ब्राह्मण समाजाच्या शिष्टमंडळाची विशेष बैठक घेऊन चर्चा केली. अमृत योजना कायम ठेवून येत्या कॅबिनेटमध्ये आर्थिक विकास महामंडळाचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन त्यांनी दिले असल्याची माहिती ब्राह्मण ऐक्य परिषदेचे संस्थापक बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी दिलीआहे. गेल्या अनेक वर्षापासून ब्राह्मण समाजाच्या या जिव्हाळ्याच्या प्रश्नांची लवकरच सोडवणूक होणार असून या निर्णयाचे सर्व स्तरातून स्वागत केले जात आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृहावर आज ब्राह्मण समाज शिष्टमंडळाशी विशेष बैठक घेऊन चर्चा केली. परळी येथे झालेल्या ब्राह्मण ऐक्य परिषदेतील मुख्य ठराव म्हणून भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी एकजुटीने मागणी करण्यात आली होती. या अनुषंगाने राज्यात समाज बांधवांच्या वतीने विविध स्तरावर आंदोलने, निवेदने व आपापल्या स्तरावरून शासन दरबारी पाठपुरावा केला गेला. परळी वैजनाथ येथे आयोजित करण्यात आलेल्या ऐक्य परिषदेत राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी सरकारच्या वतीने सकल ब्राह्मण समाजाला याबाबत समन्वयक म्हणून आपण भूमिका पार पाडू असा शब्द दिला होता. त्या अनुषंगाने सरकार दरबारी याबाबतचा पाठपुरावा सुरू होता. ब्राह्मण ऐक्य परिषदेचे संस्थापक बाजीराव भैया धर्माधिकारी यांनी सातत्याने सरकार दरबारी याबाबत पाठपुरावा केला. त्याचप्रमाणे विविध ठिकाणी समाज बांधव

... (उर्वरित पान २ वर)

CMYK

## ◆ संपादकीय...

# सार्वजनिक गणेशोत्सवामागील उद्देश लोप पावत आहे का ?



सार्वजनिक गणेशोत्सव म्हणजे केवळ श्री गणेशाची मूर्ती आणून ती एखाद्या सार्वजनिक स्थळी स्थापन करणे, एवढेच डोळ्यांसमोर न येता त्यासमवेत त्याची सजावट, त्या निमित्ताने होणारे सार्वजनिक कार्यक्रम आदी अनेक गोष्टी आपसूकच नजरेसमोर येतात. आजमितीला सार्वजनिक गणेशोत्सव केवळ मुंबई, ठाणे आणि पुणेपुरता मर्यादित राहिला नसून राज्यातील सर्वात मोठा उत्सव बनला आहे. देशातील अनेक राज्यांतही तो उत्साहाने साजरा होऊ लागला आहे. यानिमित्ताने राज्याच्या अर्थकारणात दरवर्षी मोठ्या प्रमाणात उलाढाल होत असते. शहरासारख्या ठिकाणी या दिवसांत एवढ्या मोठ्या प्रमाणात भाविकांची वर्दळ असते की कधी रात्र सुरु झाली आणि कधी संपली याचा पत्ताही लागत नाही. शहरातील सार्वजनिक गणेशोत्सवाची मजा लुटण्यासाठी देश विदेशातून भाविक आणि पर्यटक मोठ्या प्रमाणात शहरांत दाखल होतात. देशाच्या सीमा ओलांडून साता समुद्रापार ज्या ज्या ठिकाणी मराठी माणूस वसला आहे त्या त्या ठिकाणी सार्वजनिक गणेशोत्सव आज साजरा होऊ लागला आहे. मुळात 'कुटुंबातील मंडळींनी एकत्र येऊन साजरा करायचा एक सण असलेली श्री गणेशचतुर्थी सार्वजनिक उत्सव कशी बनली', हे समजून घेऊया.

सार्वजनिक गणेशोत्सवाचे प्रणेते म्हणून लोकमान्य टिळक यांना ओळखले जाते. एकदा लोकमान्य टिळकांनी ह.भ.प. श्रीपतीबुवा भिंगारकर यांना विचारले, 'मी स्वराज्यप्राप्तीसाठी प्रयत्न करीत आहे ; पण ईश्वरी साहाय्यावाचून कोणतेही कार्य शेवटास जात नाही. तेव्हा या स्वराज्याच्या कार्याचा राष्ट्रभर प्रसार होण्यासाठी कोणाची आराधना करावी ?' बुवा म्हणाले, 'तुम्ही श्री गणपतीची पार्थिव पूजा चालू करा, म्हणजे तुमचे सर्व हेतू सिद्धीस जातील.' त्यावर लोकमान्य टिळक म्हणाले, 'मी एकट्याने अशी पूजा करून भागणार नाही. राष्ट्रभर ती सर्वांनी केली पाहिजे. आपल्याकडे भाद्रपद शुद्ध चतुर्थीस घरोघर पार्थिव गणपतीची पूजा करायचा पूर्वीचा प्रघात आहेच. तो आता राष्ट्रभर चालू करूया.' तेव्हापासून लोकमान्यांच्या प्रेरणेने सार्वजनिक गणेशोत्सव चालू झाला ! यावरून आपल्याला 'सार्वजनिक गणेशोत्सव चालू होण्यामागील मूळ प्रेरणा राष्ट्रहित आणि ईश्वरभक्ती ही आहे', हे स्पष्ट होते.

'सार्वजनिक गणेशोत्सव चालू करण्यामागील आपले उद्देश कोणते आहेत', हे लोकमान्य टिळकांनी तेव्हाच एका भाषणात स्पष्ट केले. वर्ष १८९४ मध्ये झालेल्या त्यांच्या भाषणाचा सार म्हणजे 'धर्मजागृती, राष्ट्रजागृती आणि पाश्चिमात्य संस्कृतीच्या आक्रमणाचा विरोध', हे सार्वजनिक गणेशोत्सव चालू करण्यामागील मुख्य उद्देश होत. आता मनात प्रश्न येतो की, हे उद्देश आज कालबाह्य झाले आहेत का ? सध्या किती जणांमध्ये या उद्देशांचे भान आहे ? सध्या किती ठिकाणी या उद्देशांना अनुरूप ठरेल, अशा प्रकारे हा उत्सव साजरा केला जात आहे ? ज्या प्रकारे तो साजरा केला जात आहे, त्यात काही चुकत आहे का ? जे चुकत आहे, त्यामागील कारणे कोणती आणि त्यात सुधारणा कशी करता येईल ? हे आजचे ज्वलंत प्रश्न आहेत. आज अनेक ठिकाणी गणेशोत्सवासाठी वर्गणी काढताना जबरदस्ती केली जाते. काहींची आर्थिक क्षमता नसताना समाजात इतरांसोबत राहायचे म्हणून त्यांना पदरमोड करून वर्गणी द्यावी लागते. काही ठिकाणी मंडळातील कार्यकर्ते हा समजूतदारपणा दाखवतात ; मात्र काही ठिकाणी नागरिकांना वर्गणी देण्यासाठी त्रास दिला जातो हे नाकारता येणार नाही. मुळात हिंदूंमध्ये ऐक्य निर्माण करण्यासाठी सुरु केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाच्या मूळ उद्देशालाच आज हरताळ फासला जात आहे. वर्षागणिक निरनिराळी मंडळे स्थापन होऊ लागली आहे. शहरांत १००मीटरच्या परिसरातही २-३ मंडळे स्थापन झालेली पाहायला मिळतात. जवळजवळच्या मंडळांमध्ये सजावट, गणेश मूर्तीची उंची, उत्सवानिमित्त ठेवण्यात आलेले कार्यक्रम, आगमन-विसर्जन मिरवणूका अशा वेगवेगळ्या कारणांमुळे भांडणे होताना पाहायला मिळतात. ज्या ठिकाणी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी जमते अशा मंडळांच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्सवादरम्यान भलताच उत्साह संचारलेला असतो. या उत्साहाच्या भरात आलेल्या भाविकांशी वाद घालणे, त्यांना शिवीगाळ करणे असले प्रकार या काळात हल्ली बातम्यांमध्येही पाहायला मिळू लागले आहेत. भाविकांना आकर्षित करण्यासाठी मंडपात उंच गणेशमूर्ती बसवली जाते ; मात्र अनंत चतुर्दशीला तिचे पूर्ण विसर्जन न करताच कार्यकर्त्यांकडून पळ काढला जातो. ज्या गणेशमूर्तीची १० दिवस मनोभावे पूजा केली जाते, त्याच मूर्तीची पुढे अवहेलना होते. सजावट, विद्युत रोषणाई यांवर अमर्याद खर्च केला जातो. मिरवणुकांमध्ये मंगलवाद्ये वाजवण्याऐवजी अथवा सात्विक गाणी किंवा भजने लावण्याऐवजी जीवघेणा डीजे लावून त्यावर चित्रविचित्र अंगविक्षेप करत नृत्य केले जाते. आगमन विसर्जन मिरवणुकीत सहभागी होणाऱ्यांकडून काही ठिकाणी मद्यपान केले जाते. सार्वजनिक गणेशोत्सवाचे निमित्त करून काही ठिकाणी गणेश मंडपातच रात्री जुगाराचा डाव बसतो. या दिवसांत विधायक आणि समाजोपयोगी प्रबोधनात्मक कार्यक्रम ठेवण्याऐवजी काही ठिकाणी लावणी अथवा चित्रपट संगीताचे कार्यक्रम ठेवले जातात. या कालावधीत गणेश मंडपातील वातावरण सात्विक राहण्यासाठी सुमधुर भजने अथवा गणरायाची गाणी, स्तोत्र लावण्याऐवजी कर्णकर्कश आवाजात चित्रपट गीते लावली जातात. आरत्या म्हणताना त्या मंजुळ आवाजात न म्हणतात आरडाओरड करत म्हटल्या जातात. श्रीच्या मंडपात स्वच्छता ठेवली जात नाही.

श्री गणेशाच्या हा उत्सव सार्वजनिक असला तरी तो धार्मिक उत्सव आहे. राष्ट्रकार्याला धार्मिक अधिष्ठान असावे आणि त्यातून राष्ट्रजागृतीचा संदेश लोकांपर्यंत पोहोचावा या उद्देशाने लोकमान्य टिळकांनी हा उत्सव सुरु केला. आजमितीला हा उद्देश लोप पावून उत्सवात अपप्रवृत्ती शिरल्या आहेत. अर्थात वर नमूद केलेले प्रकार हे काही ठिकाणीच पाहायला मिळत असले तरी ते आपल्या धार्मिक उत्सवाला गालबोट लावणारे असल्याने ते थांबायला हवेत. आज हिंदूंमध्ये धर्मशिक्षणाचा अभाव असल्याने उत्साहाच्या भरात ते काय करत आहेत हे त्यांच्याच लक्षात येत नाही. आपल्या उत्सवात शिरलेल्या या चुकीच्या प्रथांना उखडून उत्सव सात्विक आणि लोकहिताचा व्हावा यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करण्याची आज नितांत आवश्यकता आहे.

# समाजाला योग्य दिशा देणारं वैचारिक संघटन : मराठा सेवा संघ

(मागील अंकापासुन पुढे)...

त्यामुळे होणारे नुकसान लक्षात आले. मराठा सेवा संघाने दंगली घडवणाऱ्याना उघडे पाडले. मराठा बहुजनांना दंगलीत सहभागी न होण्याचे आव्हान केले. दंगलीतून ब्राह्मणी विचारांचा फायदा होतो आपण कशासाठी मरायचे, याचा विचार तरुणांना दिला. त्यामुळे जातीय व धार्मिक दंगलींचे मोठ्या प्रमाणात उच्चाटन झाले. त्याचबरोबर मराठा सेवा संघाने छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी राजे व सर्वच बहुजन महापुरुषांचा सत्य इतिहास समोर आणला..

शिवराय हे कुळवाडी भूषण, बहुजन प्रतिपालक होते. ही महात्मा फुले यांची मांडणी समोर आणली. मुस्लिम समाजात प्रबोधन केले. दिशाभूल कळली. आज महाराष्ट्रात खूप मोठा प्रमाणात मुस्लिम बांधव शिवजयंती साजरी करतात हे मराठा सेवा संघ यामुळे घडले आहे. शिवराय, फुले, शाहू,आंबेडकर ही विचारांची साखळी जोडण्याचे कार्य मराठा सेवा संघाने केले. हा विचार एकच आहे. सार्या समाजाला पटले त्यामुळे बहुजन, दलित, आदिवासी, मुस्लिम चळवळींनी बंधुभाव व समतेची वाटचाल सुरू केली आहे ही महत्त्वाची बाब आहे. शिवाजी महाराजांवर केवळ भावनिक प्रेम करण्यापेक्षा त्यांचे मानव मुक्तीचे कार्य समजून घेऊन वाटचाल करणारी तरुण पिढी तयार केली. शिवरायांवर बेगडी प्रेम करणारे जेम्स लेन प्रकरणात उघडे पडले. समाज जागा झाला. शिवरायांचे शत्रू समाजासमोर आणण्याचे काम मराठा सेवा संघाने केले. त्याचबरोबर इतिहासातील गोष्टी कशाला उकरून काढायच्या हा प्रश्न वारंवार विचारला जातो परंतु इतिहासातील वाद संपल्याशिवाय वर्तमानातील वाद मिटत नसतात. त्यामुळे इतिहासाचे विकृतीकरण करून बहुजन समाजात गैरसमज पसरवण्यात आले होते. याविरोधात मराठा सेवा संघाने यशस्वी कार्य केले आहे. करीत आहे. इतिहासाचे विकृतीकरण थांबून इतिहास लेखनाचा आग्रह मराठा सेवा संघाने धरला आहे. धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रात ही सत्याची भूमिका मराठा सेवा संघ घेत आहे. यासोबतच शेती, शेतकरी, आत्महत्या, पाणी, वीज, बेकारी, अज्ञान, आरोग्य, कर्ज, शिक्षण,अर्थव्यवस्था, कोरोना, जागतिकीकरण अशा अनेक समस्या समाजासमोर आहेत. जग झपाट्याने बदलत आहे. या बदलत्या काळात महामानवांचे विचार आत्मसात करून वर्तमान वाटचाल करण्यासाठी नित्य प्रबोधनाची गरज आहे. ज्ञान हीच आता माणसाची ओळख झाली आहे. तुकोबांच्या शब्दांचे धन व शस्त्र यांची माहिती समजून घ्यावी लागेल. मराठा सेवा संघाच्या माध्यमातून समाज जागृती व परिवर्तनाचे कार्य सुरू आहे. सत्य समजून घेऊन वाटचाल सुरू आहे. महामानवांचे समतावादी मानवी समाजाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मराठा सेवा संघ कटीबद्ध आहे. मराठा सेवा संघाच्या विचारामुळे महाराष्ट्र, देशातील जीवनमान बदलले आहे. समाजात आपुलकी वाढली आहे. जातीय, धार्मिक दंगली थांबल्या आहेत.

हजारो तरुण-तरुणी कुटुंबे एक आनंदी श्रीमंत जीवनाचा लाभ घेत आहेत. ड.पुरुषोत्तम खेडेकर यांनी अविरत कार्यरत राहून हजारो कार्यकर्ते प्रबोधनकार, लेखक तयार केले आहेत. त्या माध्यमातून गाव, खेडी ते शहर असंख्य कार्यक्रमातून सत्य विचार सांगितला जात आहे. माणसं बदलली आहेत. मराठा सेवा संघाने त्यांना घडवलं व माणूस बनवलं आणि योग्य दिशा देण्याचे काम केले ही अत्यंत महत्वाची गोष्ट आहे. एकंदरीतच समाजाला योग्य दिशा देणार वैचारिक संघटन मराठा सेवा संघ १ सप्टेंबर रोजी ३४ वर्ष पूर्ण करीत आहे. त्यानिमित्त सर्वांना खूप खूप सदिच्छा.

**- डॉ.शिवानंद भानुसे, प्रदेश प्रवक्ते, संभाजी ब्रिगेड,महाराष्ट्र**

# पात्रुड येथील जि.प.शाळेचे मु.अ.,शिक्षक मुख्यालयी हजर नसल्याने निलंबित करा

**माजलगाव । प्रतिनिधी**



तालुक्यातील पात्रुड येथील जि.प.च्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षक मुख्यालयी हजर राहत नसल्याने त्यांच्या विरोधात गुन्हे दाखल करुन निलंबित करण्यात यावे अशी मागणी पालक तथा पत्रकार नईम आत्तार यांनी जिल्हा शिक्षण अधिकारी, बीड यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शासन निर्णयानुसार शाळेतील मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांनी ते ज्या गावातील शाळेवर अधयाने काम करतात त्यांनी त्या मुख्यालयीच राहणे बंधनकारक आहे, पण माजलगाव तालुक्यातील पात्रुड येथील जि.प.च्या प्राथमिक व माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक मुख्यालयी राहत नाहीत. तर त्यांचा सुख सोईने शहराच्या ठिकाणी राहुन शासन निर्णयाचे उलंघन करत आहेत. त्यांना मुख्यालयी राहण्याची वारंवार विनंती केली होती पण त्यास प्रतिसाद दिला नाही. यावर केंद्र प्रमुख संजय कुलकर्णी यांच्या कडे वारंवार तोंडी तक्रार केली होती त्यांनी हि काहिच निर्णायक भुमीका न घेता त्या तक्रारींची दखल न घेता सर्वांनाची पाठराखण केली आहे. शासनाच्या धोरणा प्रमाणे सर्व शिक्षकांना मुख्यालयी राहण्यासाठी शिक्षकांच्या वेतनानुसार त्याची १०टक्के रक्कम घरभाडे म्हणुन दरमहा अदा करण्यात येते. मात्र पात्रुड येथील शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक मुख्यालयी न राहता शासना कडुन देण्यात येणारे घरभाडे घेऊन शासनाची फसवणुक करीत आहेत करीता त्यांच्या विरोधात गुन्हे दाखल करुन निलंबित करण्यात यावे. तसेच त्यांची पाठराखण करणारे केंद्र प्रमुख संजय कुलकर्णी यांना निलंबित करण्यात यावे निवेदनाची दखल घेऊन कार्यवाही न झाल्यास १०सप्टेंबर रोजी जिल्हा शिक्षण अधिकारी, बीड कार्यालया समोर अमरण उपोषण करण्याचा इशारा निवेदनात शेवटी दिला आहे.



*बीड : दोन दिवसांपासून बीड जिल्ह्यामध्ये सततधार पाऊस पडत असल्याने सिंदफना नदीला पुर आला होता. कुक्कडगाव येथील बंधारा भरून ओसांडून वाहत होता.*



**भारताच्या कृषी संस्कृतीचे महापर्व... बैल पोळा हार्दिक शुभेच्छा !**
**पुंजा रे बैलाले.. फेडा उपकाराचे देणे, बैला, पोळा तुझा खरा सण,**
**शेतकऱ्यांच्या माथी तुझे रे रीन, कष्टाविना मातीला, आणि बैलाविना शेतीला नाही रे पर्याय...!**
**बैल पोळ्याच्या निमित्ताने भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष...**
**मा. राजेंद्र मस्के यांनी पालवण येथे पारंपारिक पद्धतीने सहकुटुंब बैलांचे पुजन करुन कृतज्ञता व्यक्त करून, शेतकरी बांधवांना बैल पोळ्याच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.**

◆ पान १ वरून पुढे...

## स्व. विनायकराव मेटे यांना ...

पुरस्काराची शिफारस केली होती. त्यानुसार राष्ट्रकूल संसदीय मंडळाकडून हा पुरस्कार जाहीर केला होता. शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय मा.आ. विनायकराव मेटे यांना 'उत्कृष्ट संसदपटू' पुरस्कार जाहीर झाल्याने बीड जिल्ह्यासह सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.

तीस वर्षांच्या सार्वजनिक जिवनात मराठा आरक्षण, मुस्लिम आरक्षण, धनगर आरक्षण, अरबी समुद्रातील आंतरराष्ट्रीय शिवस्मारकासाठी रस्त्यावरची लढाई लढतानाच विधीमंडळातही आक्रमक आणि अभ्यासू मांडणी करणाऱ्या दिवंगत लोकनेते विनायकराव मेटे यांना २०२० - २०२१ या वर्षाकरता महाराष्ट्र विधानपरिषद 'उत्कृष्ट संसदपटू' पुरस्कार जाहीर झाला आहे.

मराठा महासंघातून मराठा आरक्षण लढ्यात सामील झालेले दिवंगत मेटे २७ वर्षे विधान परिषदेचे सदस्य राहीले. सर्वाधिक वेळा विधान परिषद सदस्य म्हणून शपथ घेण्याचा त्यांचा विक्रम कायम आहे. मराठा आरक्षणाबरोबरच अरबी समुद्रातील आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिवस्मारक, मुस्लिम आरक्षण, धनगर आरक्षण, शासकीय नोकर भरतीमधील वयाची अट, शेतकऱ्यांना निवृत्ती वेतन, मराठा समाजातील होतकरू विद्यार्थ्यांना उच्च व परदेशी शिक्षणाकरिता विद्या वेतन व मार्गदर्शनाकरिता सारथी या स्वायत्त संस्थेच्या स्थापनेची संकल्पनाही मांडण्यातही त्यांचा पुढाकार होता.त्याद्वारे असंख्य विद्यार्थ्यांना लाभ मिळवून दिला. पोलीस भरतीतील उमेदवारांसाठी वयोमर्यादा वाढविण्यासाठी यशस्वी पाठपुरावा केला. या बाबतच्या मागण्यांसाठी आपल्या आक्रमक आणि अभ्यासू भाषणाने दिवंगत विनायकराव मेटे यांनी कायम विधीमंडळाचे सभागृह दणाणून सोडले. या मागण्यांसाठी त्यांनी रस्त्यावरचीही लढाई लढली. दरम्यान, १४ ऑगस्ट २०२२ रोजी मराठा आरक्षणाबाबत मुख्यमंत्र्यांनी बोलविलेल्या बैठकीला जाताना त्यांचे दुर्दैवी निधन झाले. परंतु, त्यांच्या कर्तृत्वाचा उत्कृष्ट संसदपटू या पुरस्काराने त्यांच्या पश्चात् सन्मान झाला त्यांच्या पत्नी शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ. ज्योती मेटे यांनी राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला.

## राज्य प्रशासकीय सेवेतील...

यावर मार्ग काढून शासनाने सेवाजेष्ठता यादी बनवताना या जास्तीच्या पदोन्नत केलेल्या तहसीलदार संवर्गातील अधिकाऱ्यांना खालील ज्येष्ठता क्रमांक दिला आहे.

या मागची एकूण पार्श्वभुमी- शासनाने नियमानुसार केलेल्या या कारवाईने व्यथित होऊन काही पदोन्नत उपजिल्हाधिकारी हे सुरुवातीला मॅट औरंगाबाद येथील न्यायालयात गेले. तेथे त्यांच्या विरोधात निकाल लागल्यानंतर ते पुन्हा उच्च न्यायालय- औरंगाबाद खंडपीठात गेले. तेथेही प्रकरण विरोधात गेल्यानंतर त्यांनी सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल केली होती. ती याचिका दिनांक २ सप्टेंबर २०२४ रोजी फेटाळली गेली.यामुळे उपजिल्हाधिकारी संवर्गाचा सेवा जेष्ठता वाद हा अंतिमरित्या संपुष्टात आला. आता उपजिल्हाधिकारी संवर्गाची प्रशासकीय कुंठितता दूर करून त्यांना अपर जिल्हाधिकारी ही पदोन्नती द्यावी अशी मागणी महसूलमंत्री राधाकृष्ण विखे यांच्याकडे उपजिल्हाधिकारी यांनी केली असून याबाबत तेही सकारात्मकता दर्शवीली आहे.

## प्रौढ बीसीजी लसीकरण...

अधिकारी. डॉ. महेश माने जिल्हा क्षयरोग अधिकारी. डॉ संजय कदम सर तालुका आरोग्य अधिकारी बीड यांची उपस्थिती होती. यावेळी अधिकारी डॉ रियोजोदिन सय्यद. डॉ. प्रज्ञा तरकसे. डॉ. सोनाली जाधव व सर्व आरोग्य अधिकारी. कर्मचारी. आशासेविका. गटप्रवर्तक. लाभार्थी व मोठय़ा संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी प्रौढ नागरिकांनी उस्फूर्तपणे लसीकरणसाठी सहभाग नोदवावा यासाठी आवाहन करण्यात आले.यावेळी पत्रकार गणेश काळे, संजय काळे, श्रीपती काळे,खालेद भाई,लालू खासाब,जालिंदर तांब्रे,मिनेश राऊत,अशोक तावरे सह ग्रामस्थ उपस्थित होते.



## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १२५२/२०२४**

**ॲड. शिंदे एस. बी. यांच्या मार्फत**

**अर्जदार-** १) हिराबाई उध्दव काळेबेरे, वय ६६ वर्षे, धंदा- घरकाम, रा. नेकनूर, ता. जि.बीड, २) संतोष उध्दवराव काळेबेरे, वय- ३६ वर्षे, धंदा - मजुरी, रा. नेकनूर, ता. जि. बीड, ३) सुरज उध्दवराव काळेबेरे, वय-३० वर्षे, धंदा - मजुरी, रा. नेकनूर, ता.जि.बीड

**विरुध्द**

**गैरअर्जदार :- निरंक**

**अर्जदार हे भारतीय आहेत**

**प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे **उध्दव शंकरराव काळबेरे** यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे **उध्दव शंकरराव काळबेरे, रा. नेकनूर, ता. जि. बीड हे दिनांक ०१/०२/२०१९ रोजी मौजे नेकनूर, ता. जि. बीड** येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्रं. १ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क्रं. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. मयताचे आई वडील बऱ्याच वर्षापुर्वी मयत झालेले आहेत. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पुढील दिनांक ०८/१०/२०२४.** आज दिनांक ०३ /०९/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)
क.लिपीक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड


◆ पान १ वरून पुढे...

## सरस्वती नदीच्या पुराचे पाणी...

पाणी शिरले असून अनेक जणांचे संसार हे पाण्यात बुडाले आहेत. नगरपालिका प्रशासनाने या गोष्टीची खबरदारी म्हणून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देणे आवश्यक होते. परंतु तशा सूचना दिल्या गेल्या नाहीत. इंदिरानगर, कृष्णा नगर, कीर्ती नगर,गंगासागर नगर ,शनी मंदिर ,अम्बवेस, भोई गल्ली, गोपाळकृष्ण टॉकीज च्या पाठीमागे भाग,शनी मंदिर या पुराच्या पाण्याने जास्त प्रभावित झाले आहे.नाले सफाई ची मोहीम हाती घेण्यात आली होती का?अशी चर्चा आता जोर धरत आहे. आपातकालीन सेवा फक्त नवापूर दिसून येतआहे.

## घोंगडी बैठकाचा सांगावा...

देण्यासाठी वडवणी तालुक्यातील मराठा सेवकांच्या फौजने गाव दौरा सुरू केला आहे.या दौऱ्याला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी जो लढा उभा केला आहे त्याला एक वर्षे पुर्ण झाले असून आता विधानसभा निवडणूकीत लढायचे की पाडायचे, ही भुमिका ठरविण्यासाठी घोंगडी बैठका घेण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील ६ मतदारसंघात बैठका होत असून शुक्रवार दि.६ सप्टेंबर रोजी तेलगाव येथे सकाळी ११ वा जिजाऊ मंगल कार्यालय या ठिकाणी घोंगडी बैठक होणार आहे.या बैठकीला गावागावातुन मोठ्या प्रमाणात मराठा बांधव येणार असून त्याची जय्यत तयारी सुरू आहे. सद्यस्थितीत घोंगडी बैठकीचा सांगावा घेवून वडवणी तालुक्यातील मराठा बांधवांची फौज वडवणी तालुक्यातील ग्रामीण भागातील सर्व गावा गावात जाऊन पाटील यांचा सांगावा घेवून जात आहेत.शुक्रवार दि.६ सप्टेंबर रोजी होणाऱ्या घोंगडी बैठकीला गावागावातून म राठा बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहतील, असे सर्वच ग्रामस्थांनी विश्वास दिला आहे. तालुक्या चिंचवन, हिवरगाव ,पुसरा,तिगाव,चिंचाळा चिंचवडगाव, काडीवडगाव,पिंपरखेड,ख लिमगाव,परडी माटेगाव, ,हरिश्चंद्र पिंपरी ,चिंचोटी, देवडी, देवगाव, खापरवाडी ,कवडगाव ,मोरेवाडी ,मामला ,साळींबा ,मोरवड, पिंपळ टक्का, सोनाखोटा, चिखलबीड, खडकी, देवळा,रुई, पिंपळा, कान्हापुर, लक्ष्मीपुर, कुप्पा, ऊपळी,केडेपिंप्री,लोणवळ,ढोरवाडी,धानोरा,वडवणी शहरासह अदि गावात पाटलांचा सांगावा घेऊन सकल मराठा वडवणी तालुक्याची फौज गावागावात पोचली याला प्रचंड प्रतिसाद भेटला.

## जिल्ह्यात बस सेवा...

नाकारता येत नाही.

▶ बीड जिल्ह्यात नऊ आगारातील बस सेवा बंद-आज सकाळपासून बीड जिल्ह्यातील ९ आगारातील सर्व बस सेवा चालक आणि वाहक यांनी संप पुकारला आहे. आम्हाला शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे वेतन द्या, ही मागणी घेऊन कर्मचाऱ्यांनी आज संप पुकारलेला आहे. एसटी कर्मचारी अनेक वर्षांपासून आपल्या न्याय हक्कासाठी आणि विविध मागण्यासाठी लढत आहेत. तरीही त्यांच्या मागण्या मान्य होत नसल्यानं हे कर्मचारी सरकारचे लाडके नाहीत का ? असा सवाल परिवहन महामंडळाचे कर्मचारी सरकारला करत आहेत.

▶ या आहेत एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्या सातव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी करावी, राज्य शासनाच्या कर्मचाऱ्याप्रमाणं वेतन देण्यात यावं, डी. अँड डी. प्रोसिजरमधील । जाचक अटी रद्द कराव्यात यासह इतर मागण्या आहेत. बीड जिल्ह्यातील एस. टी. कामगार संघटना, एस.टी. कामगार सेना, कस्ट्राइब संघटना, कष्टकरी जनसंघ आणि अन्य संघटना संपात सहभाग होणार असल्याचा दावा केला जात आहे.

## दिलासादायक:अमृत योजना...

उपोषणाला बसले होते. त्यावेळीही वेळोवेळीही ना.धनंजय मुंडे यांनी सकारात्मक भूमिका घेत ब्राह्मण समाजाला आश्वासित केले होते. तीच भूमिका पार पाडत सरकारच्या स्तरावर हा प्रश्न सोडवण्यासाठीही धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून ब्राह्मण समाज शिष्टमंडळाची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत ची बैठक ठरवण्यात आली. या बैठकीत देवेंद्र फडणवीस यांनी ब्राह्मण समाज शिष्टमंडळाशी सविस्तर चर्चा केली. अमृत योजना कायम ठेवून लवकरात लवकर भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ हे ब्राह्मण समाजासाठी स्वतंत्र महामंडळ निर्माण करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. या शिष्टमंडळात ब्राह्मण ऐक्य परिषदेचे संस्थापक बाजीराव भैया धर्माधिकारी,परळी वैजनाथ, विश्वजीत देशपांडे,पुणे,मनोज जोशी, लातूर, शैलेश कुलकर्णी, अंबेजोगाई, अजिंक्य पांडव, बीड , सचिन वाडे पाटील, संभाजीनगर,महेश दोरवट पाटील, संभाजीनगर,काकासाहेब कुलकर्णी, सोलापूर, संजय कुलकर्णी-सुपेकर, गंगाखेड,रमण उपाध्याय, जालना,डॉ. संजीवनी पांडे, मुंबई, विजया कुलकर्णी, संभाजीनगर सूर्यकांत देशमुख, बार्शी, शशांक खेर, डोंबिवली, आलोक चौधरी- सेलू, सौ. धनश्रीताई उत्पात, पंढरपूर आदीसह ब्राह्मण समाजातील प्रमुख समन्वयक पदाधिकारी उपस्थित होते.

## ◆ थोडक्यात...

### उद्योगासाठीच्या तांत्रिक प्रशिक्षणासाठी इच्छुक उमेदवारांना अर्ज करण्याचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

उद्योगांसाठी आवश्यक असलेले तांत्रिक प्रशिक्षण देणाऱ्या इंडो जर्मन टूल रूम (छत्रपती संभाजीनगर) या लघु सूक्ष्म आणि मध्यम उद्‌योग मंत्रालयाच्या अखत्यारीत येणाऱ्या भारत सरकारच्या नावाजलेल्या प्रशिक्षण संस्थेशी महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) पुणे या संस्थेने सामंजस्य करार केला आहे. अमृत संस्थेकडून इंडो जर्मन टूल रूम (छत्रपती संभाजीनगर) च्या माध्यमातून प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारांना सहाय्य केले जाणार असून इच्छुक पात्रताधारक उमेदवारांनी या प्रशिक्षणासाठी २० सप्टेंबर २०२४ पर्यंत www.mahaamrut.org.in या संकेतस्थळावर अर्ज करण्याचे आवाहन अमृतच्या निबंधक डॉ. प्रिया देशपांडे यांनी केले आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत अमृत संस्थेच्या लक्षित गटातील उमेदवारांना उत्कृष्ट दर्जाचे निवासी तसेच अनिवासी प्रशिक्षण देण्यात येणार असून सदर प्रशिक्षणाचा संपूर्ण खर्च (प्रशिक्षण, राहणे व जेवण) अमृत संस्थेमार्फत करण्यात येणार. योजनेची सविस्तर माहिती www.mahaamrut.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या योजनेचा अमृतच्या लक्षित गटातील युवक-युवतींनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी दीपक जगताप ९६७३७१४१७०, अनिकेत देशमुख ९६६५१६२४४१ किंवा आनंद निकाळजे ९३२५४८७०७३ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

### धारुर शहरातील मानाचा शिनगारे मुकदम परिवातील बैल पोळा उत्साहात साजरा



**बीड । प्रतिनिधी**

कृषीप्रधान संस्कृतीमधला महत्त्वाचा सण म्हणजे बैलपोळा, कष्टाशिवाय मातीला बैलाशिवाय शेतीला आन बळी पर्याय नाही वर्षभर रावणाऱ्या बैलाचा हा सण या सणाला आजच्या या दिवशी बैलांना बाशिंग बांधून अंगावर झूल टाकून गावच्या वेशीचे तोरण तोडून संपूर्ण गावातून मिरवून आणल्यानंतर कुटुंबासोबत बैलांची पूजन करुन बालासाहेब शिनगारे मुकदम यांचा बैल पोळा चाहूर चाहूर चांगभलं, पाऊस आला घरला चला अशा आशयाचे ग्रामीण गीत म्हणत कष्टकरी बळीराजाचा जोडीदार असलेल्या बैलजोडीचे पूजन करून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या शेतकऱ्यांच्या बैलजोडी मिरवणूक निघाल्यानंतर इतर शेतकऱ्यांच्या बैल जोडीची मिरवणूक निघते ही परंपरा चालत आलेली आज ही किल्ले धारुर शहरात जपली जाते. बैलपोळा हा सण शेतकरी मोठ्या उत्साहामध्ये साजरा करतो. वर्षभर रावणाऱ्या बैलाचा हा सण या सणाला बैलाला पोळ्याच्या अगोदरपसूनच बैलांची खाण्या पाण्यापासून ते रोज अंघोळ घालून स्वच्छ ठेवणे आधीची काळजी घेतली जाते. बैलांची पोळ्याच्या आदल्या दिवशी खांदे मळणी केली जाते. पोळ्या दिवशी बैलांना झुली, चंगाळे, बाशिंग आदी बांधून बैलांना सजवून मिरवणूक साठी सज्ज केले जाते. शहरामधील कसबा विभागात ७५ वर्षांपासून बैलपोळ्याचा मान मुकदम शिनगारे, शिनगारे, शिंदे, देशपांडे आदींना या बैलपोळ्याचा मिरवणुकीचा मान मिळालेला आहे. या शेतकऱ्यांच्या बैलजोडी मिरवणूक निघाल्यानंतर इतर शेतकऱ्यांच्या बैल जोडीची मिरवणूक निघते ही परंपरा चालत आलेली आज ही जपली जाते. मानाचे शेतकरी आपली बैलजोडी मिरवणूक बैलाची सजावट करून मोठ्या उत्साहामध्ये गावठी हलक्या, वाजवत मिरवणूक काढतो. त्यानंतर त्यांच्या मागे इतर शेतकरी बैलजोडीची मिरवणूक काढली जाते.

### शेगाव ते पंढरपूर पालखी मार्गाची तत्काळ दुरूस्ती करावी : सार्वजनिक बांधकाम मंत्री दादाजी भुसे

**मुंबई । प्रतिनिधी**

शेगाव ते पंढरपूर पालखी महामार्गावर ठिकठिकाणी तडे गेल्यामुळे या रस्त्याची तत्काळ दुरूस्ती करण्याचे निर्देश सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री दादाजी भुसे यांनी दिले. मंत्रालयात आज शेगाव ते पंढरपूर महामार्गाच्या दुरूस्तीबाबत झालेल्या आढावा बैठकीत मंत्री श्री. भुसे बोलत होते. यावेळी आमदार संजय रायमुलकर, एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अ. ब. गायकवाड, मुख्य अभियंता एस. के. सुरवसे, सह व्यवस्थापकीय संचालक कैलास जाधव, व्यवस्थापक दत्तप्रसाद नडे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. मंत्री श्री.भुसे म्हणाले, या पालखी मार्गाच्या दुरूस्तीचे काम ज्या कंपनीने अपूर्ण ठेवले आहे, त्या कंपनीच्या अनामत रकमेतून उर्वरित कामे पूर्ण करण्यात यावीत. तसेच संबंधित कंपनीवर आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचनाही यावेळी मंत्री श्री. भुसे यांनी दिल्या.

### अमरावतीच्या लुंबिनीनगर येथे पित्याकडून पुत्राची हत्या

**अमरावती । प्रतिनिधी**

स्थानिक फेजरपुरा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या लुंबिनी नगर येथे मंगळवार दिनांक ३ सप्टेंबर रोजी दुपारी एका पित्याने आपल्या मुलावर सत्तूरने वार करून त्याचा खून केला. राहुल पांडुरंग काकडे ४० असे मृताचे नाव आहे. पांडुरंग काकडे (६२) याला तातडीने अटक केली आहे. पांडुरंग काकडे हा मंगळवारी दुपारी कामाहून घरी परतल्यानंतर शुल्लक कारणावरून वाद झाला. कुठल्याशा तरी कारणावरून राहुलने पिता पांडुरंग यांना टोमणा मारला. त्यामुळे दोघांमध्ये शाब्दिक चकमक झाली. वादा दरम्यान पांडुरंग काकडे याने मुलगा राहुल याला सत्तूरने भोसकले. राहुल याच्या गळ्यावर व मानेवर सत्तूरने वार करण्यात आल्याने तो रक्तबंबाळ स्थितीत घरातच कोसळला.





*संततधार पावसाने शहर तुंबले....! बीड शहरामध्ये काल दिवसभर संततधार पाऊस पडला. या पावसामुळे शहरात पाणीच पाणी जमा झाले होते. जालना रोडवरील डिपीला पाणी लागले होते. तसेच इतर ठिकाणी रस्त्यावरील पाण्यामुळे नालीतील कचरा रस्त्याने वाहत असतांना दिसून आले. नगर पालिका प्रशासनाने पावसाळ्याच्या आधी नाल्या साफ के ल्या असत्या तर आज शहर तुंबले नसले. (छायाः आराध्य नरनाळे).*

# २० सप्टेंबर रोजी डिजिटल मिडियाचे प्रशिक्षण शिबिर

## मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांचे डिजीटल मिडीयाला सहभागाचे आवाहन

**पुणे । प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद आणि डिजिटल मिडिया परिषदेच्या वतीने येत्या २० सप्टेंबर २०२४ रोजी पिंपरी चिंचवड येथे डिजिटल माध्यमातील पत्रकारांसाठी एक दिवसाच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. डिजिटल मिडियातील मान्यवर प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करणार असल्याने हे शिबीर डिजिटल मिडिया क्षेत्रातील मैलाचा दगड ठरणार आहे. अशा पध्दतीची कार्यशाळा महाराष्ट्रात प्रथमच होत असल्याने डिजिटल मिडियाच्या पत्रकारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम देशमुख यांनी केले आहे. मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख यांनी पुढे म्हटले आहे की, प्रिन्ट आणि इलेक्ट्रॉनिक मिडिया नंतर आता डिजिटल मिडियाचं युग आलं आहे. एकट्या महाराष्ट्राचा विचार केला तर ५००० पेक्षा जास्त युट्यूब चॅनल्स चालविले जातात. सुमारे १०,००० पेक्षा जास्त पत्रकार या प्लॅटफॉर्मवर काम करतात. मात्र पुरेशा तांत्रिक माहिती अभावी बहुतेकजण व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी होताना दिसत नाहीत. ही गोष्ट अ. भा. मराठी पत्रकार परिषदेच्या लक्षात आल्यानंतर परिषदेने वर्षभरात विविध भागात अशा पाच कार्यशाळा घेण्याचं नियोजन केलं आहे. या कार्यशाळेतून मान्यवरांचे मार्गदर्शन सहभागींना मिळणार आहे. यातील पहिली कार्यशाळा २० सप्टेंबर रोजी पिंपरी चिंचवड येथील आचार्य अत्रे सभागृहात होणार आहे. या शिबिरात केवळ ३५० पत्रकारांनाच प्रवेश दिला



जाणार असल्याने वेळेत नोंदणी करणे आवश्यक आहे.

युट्यूब चालविणारे किंवा चालवत असलेल्या पत्रकारांसाठी हे शिबिर अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या शिबिरासाठी २०० रूपये शुल्क आकारले जाणार असून त्यामध्ये नाश्ता, दुपारचे जेवणही दिले जाणार आहे. या शिवाय सहभाग प्रमाणपत्र देखील दिले जाणार आहे. शिबिरात डिजिटल मिडियाची राज्य कार्यकारिणीही निवडली जाणार असल्याने संघटनात्मक कार्याची आवड असलेल्या इच्छुकांना नेतृत्वाची संधी मिळणार आहे. या प्रशिक्षण शिबिराचा फायदा घेण्याचे आवाहन मुख्य विश्वस्त एस.एम देशमुख, विश्वस्त किरण नाईक, अध्यक्ष शरद पाबळे, कार्याध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, सरचिटणीस मन्सूरभाई, डिजिटल मिडियाचे राज्य कार्याध्यक्ष अनिल वाघमारे, उपाध्यक्ष सनी शिंदे, विभागीय सचिव गणेश मोकाशी, पिपरी चिंचवड पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल वडघुले, पिपरी चिंचवड डिजिटल मिडियाचे अध्यक्ष महावीर जाधव आदिंनी केले आहे. अधिक माहितीसाठी पिंपरी चिंचवड पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल वडघुले (९८२२० ८३०६४) या क्रमांकावर संपर्क साधावा.

### दादासाहेब फाळके चित्रपट संघटनेच्या महाराष्ट्र सचिव पदी प्रितम पवळ यांची निवड

**आष्टी । प्रतिनिधी**



तालुक्यातील सुलेमान देवळा येथील प्रितम सोन्याबापू पवळ अर्थातच प्रेम कवी हे गेल्या आठ नऊ वर्षांपासून साहित्य क्षेत्रात जोमाने काम करतं आहेत पंतप्रधान, मुख्यमंत्री, राज्यमंत्री, आमदार, खासदार यांच्या हस्ते त्यांचा गुणगौरव देखील करण्यात आला आहे त्यांचे आजपर्यंत तीन काव्यसंग्रह व एक वात्रटिका संग्रह दिग्गज व्यक्तीच्या हस्ते प्रकाशित आहेत ते साहित्य क्षेत्राबरोबरच एक निर्भिड पत्रकार देखील आहेत याचीच दखल घेऊन त्यांना दादासाहेब फाळके चित्रपट युनियन यांच्याकडून महाराष्ट्र सचिव पदी निवड करण्यात आली

ही निवड संघटनेचे अखिल भारतीय अध्यक्ष अजीत म्हामूनकर यांनी नियुक्तीपत्र दिले आहे. चित्रपट क्षेत्रात तरुण पीढीचे सकारात्मक विचार रुजावेत तसेच समाजप्रबोधनपर चित्रपट निर्माण व्हावेत या उद्देशाने संघटन वाढीसाठी प्रयत्नशील राहील या उद्देशाने आम्ही प्रयत्न करत आहोत असे अजित म्हामूनकर यांनी सांगितले.



*बैलपोळा साजरा करताना शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी त्यांच्या गावी कुटुंबीय व गावकऱ्यांसोबत बैल पोळा आनंदात साजरा केला. वर्षभर शेतात राब राब राबणाऱ्या बैलांविषयी कृतज्ञता मानण्याचा आजचा दिवस.... ईडा पीडा टळू दे बळीचे राज्य येऊ दे...!!*

# संत तुकारामांची अभंगरचनेमागील भूमिका समजून घेणे गरजेचे: प्राचार्य डॉ.शिरीष लांडगे

**कन्नड । प्रतिनिधी**

संत तुकारामांची अभंगकविता मनाला ऊर्जा देणारी आहे. जणांच्या कल्याणासाठी हितोपदेश करणारी आहे. अभंगरचनेमागील संत तुकारामांची ओढ ही मानवी कल्याणाची आहे. संत तुकाराम आपली अभंगलेखनामागील भूमिका जाहीर मांडतात. ही भूमिका समजून घेणे गरजेचे आहे असे विचार प्राचार्य डॉ.शिरीष लांडगे यांनी व्यक्त केले. ते डॉ. सुभाष बागल लिखित 'संत तुकारामांचे अभंग: एक चिंतन ' या ग्रंथावर आधारित कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयाच्यावतीने आयोजित दिवशीय राज्यस्तरीय चर्चासत्राच्या बीजभाषण प्रसंगी बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले हे होते. चर्चासत्राचे उद्घाटन संत साहित्याचे अभ्यासक डॉ. अशोक देशमाने



यांच्या शुभहस्ते झाले. याप्रसंगी त्यांनी संत तुकाराम हे विशाल व्यक्तिमत्त्वाचे संत होते. संतांच्या अभंगवाणीने समाज परिवर्तनाचे महत्त्वाचे कार्य केले. डॉ. सुभाष बागल यांनी या ग्रंथरूपाने मांडलेले हे चिंतन अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा ग्रंथांची आवश्यकता आहे. अशा ग्रंथामुळे तुकारामांची कविता विविधांगाने समजून घेता येईल. असे प्रतिपादन केले. प्रमुख पाहुणे म्हणून देवगिरी महाविद्यालयाचे उपप्राचार्य सुरेश लिपाने, 'संत तुकारामांचे अभंग: एक चिंतन ' या ग्रंथाचे लेखक डॉ. सुभाष बागल शिवाजी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. मगर यांची प्रमुख उपस्थिती होती. अभंग गाऊन मान्यवरांचे स्वागत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी केले. डॉ. शिवाजी हुसे यांनी पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रामचंद्र झाडे यांनी केले प्रदर्शन डॉ. प्रेमला मुखेडकर यांनी केले. दुसरे सत्रामध्ये 'संत तुकारामांची अभंगरचने मागील प्रेरणा ' या विषयावर सांगली येथून आलेले डॉ. धनंजय होनमाने, डॉ.न.भ. कदम आणि डॉ. बालाजी जाधव यांनी आपले विचार मांडले. सत्राध्यक्ष म्हणून डॉ. दत्तात्रेय डुंबरे हे होते. दुपारच्या तिसऱ्या सत्रामध्ये 'संत तुकारामांची अभंगवाणी आणि भावाविष्कार' या विषयावर विविध महाविद्यालयातून आलेल्या अभ्यासक, प्राध्यापकांनी संत तुकारामांच्या विविध रचना प्रकारावर निबंध सादर केले. त्यामध्ये डॉ. पुरुषोत्तम जुन्ने,( अंबड ), डॉ. राम रौनेकर,( अंबड) डॉ संतोष तांदळे,(सोयगांव), डॉ. मोहन बाभुळगावकर,( छत्रपती संभाजी नगर), डॉ. अनिता खंडागळे,(लिंबाजी चिंचोली) डॉ. ऋषी बाबा शिंदे (घनसावंगी ), डॉ. शेख एजाज,( खुलताबाद ) यांच्यासह अनेक प्राध्यापकांनी आपले निबंध सादर केले. तिसऱ्या सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. दिलीप बिरुटे हे होते. समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संत साहित्याच्या अभ्यासक डॉ. रुपेश मोरे हे होते.

### माजलगावात सद्गुरू रामानंद महाराजांच्या पुण्यतिथीनिमीत्त शताब्दी महोत्सव

**माजलगाव । प्रतिनिधी**



श्री. समर्थ सद्गुरू रामानंद महाराजांच्या शंभराव्या पुण्यतिथीनिमीत्त शताब्दी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असुन राजस्थानी सेवा मंडळाच्या वतीने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन दि. १८ ते २५ सप्टेंबर दरम्यान करण्यात आले असल्याची माहिती रामानंद मठ संस्थानचे मठाधिपती तथा संयोजक ह.भ.प. ज्ञानेश्वर माउली महाराज माजलगावकर यांनी दिली आहे.

दिपप्रज्वलन माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील यांच्या हस्ते करण्यात येणार असुन विनापूजन ह.भ.प. भागवानबाबा पात्रुडकर यांच्या हस्ते होणार आहे. या हरिनाम सप्ताहात ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण तथा श्रीमद् भागवत ज्ञानयज्ञ सोहळा होणार असुन कथा प्रवक्ते वे.शा. सं.भागवताचार्य अनिल महाराज हे असुन ज्ञानेश्वरी व्यासपिठ चालक ह.भ.प. परमेश्वर महाराज कुरे हे आहेत. किर्तनविणा प्रमुख ह.भ.प. सुभाष महाराज होगे हे आहेत. मृदंगवादक म्हणुन मृदंगमहर्षी भरत पठाडे, मृदंगअलंकार शत्रुघ्न पठाडे, मृदंगविशारद ज्ञानेश्वर माउली जाधव हे असणार आहेत. दि. १८ बुधवारी पहिल्या दिवशी ह.भ.प. भागवताचार्य तुकाराम शास्त्री मुंडे यांचे किर्तन तर ह.भ.प. योगीराज महाराज गोसावी, ह.भ.प.प्रकाश महाराज साठे, ह.भ.प.सगुणउपासक अनिल पाटील, ह.भ.प. एकनाथ महाराज माने, ह.भ.प. अर्जुनशास्त्री लाड, सुनिल महाराज झांबरे यांचे तर दि. २५ बुधवारी धर्मगुरू अमृताश्रम स्वामी महाराज बीड यांचे काल्याचे किर्तन होईल. यानंतर अभय राजाभाउ होके पाटील यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

# जामखेड येथे भव्य ग्लॅमरस दहीहंडी, कल्पनाच केली नव्हती : अभिनेत्री सोनाली कुलकर्णी

- आमदार रोहित पवार यांच्या माध्यमातून मतदारसंघात विकासाचा कायापालट
- जामखेड येथे दहीहंडी उत्सव उत्साहात साजरा
- फलटण येथील जय हनुमान गोविंद पथकाने पटकाविले प्रथम पारितोषिक

**कर्जत/जामखेड येथे सालाबादप्रमाणे यावर्षीही आमदार रोहित पवार मित्र मंडळाच्या वतीने भव्य दहीहंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. जामखेडमध्ये २ सप्टेंबरला शहरातील श्री नागेश विद्यालयात दहीहंडी स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या कार्यक्रमाप्रसंगी आमदार रोहित पवार भावी मुख्यमंत्री म्हणून अनेकांच्या हातात बॅनर होते.**

**जामखेड । प्रतिनिधी**

मुंबई, पुणे अशा मोठ-मोठ्या शहरात दहिहंडी उत्सव साजरा होतो.किंबहूना त्याहून ही जास्त दहिहंडी चे भव्य स्वरूप जामखेड येथे बघायला मिळाले आहे. कार्यक्रमात एन्ट्री करण्यासाठी साधारणपणे अर्धातास लागला असून खुप - खुप कौतुक वाटते कारण, मुंबई, पुण्याला लाजवेल असे दहीहंडी उत्सवाचे आयोजन बघायला मिळतेय.असे यावेळी दहिहंडी उत्सव कार्यक्रमा प्रसंगी अभिनेत्री सोनाली कुलकर्णी बोलत होत्या.

जामखेड येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य अशा दहीहंडी स्पर्धेचे आमदार रोहित दादा पवार मित्र मंडळाच्या वतीने भव्य दहीहंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात



आले होते.

या स्पर्धेत राज्यातील अनेक गोविंदा पथकांनी सहभागी होऊन थरावर थर रचत रसिकांना आपले कौशल्य दाखवलं. यावेळी प्रसिद्ध आघाडीची सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी आणि ऋता दुर्गुळे यांनीही या कार्यक्रमाला हजेरी लावली. त्यांनी गायलेल्या गीतांनी आणि केलेल्या नृत्याने दहीहंडीसाठी उपस्थित सर्वच नागरिकांना मंत्रमुग्ध केलं.

प्रदेश सरचिटणीस राजेंद्र कोठारी,जेष्ठ नेते वैजिनाथ पोले, दत्तात्रय वारे, सूर्यकांत मोरे, जिल्हा बँकेचे संचालक अमोल राळेभात, प्रा.संजय

वराट ,तालुकाध्यक्ष विजयसिंह गोलेकर, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे मंगेश आजबे,शहराध्यक्ष राजेंद्र गोरे, दत्तात्रय सोले पाटील,उमर कुरेशी,प्रथम नगराध्यक्ष विकास राळेभात, चेअरमन सुंदरदास बिरंगळ,तालुका उपाध्यक्ष हनुमंत पाटील,महिला तालुकाध्यक्षा राजश्रीताई मोरे, वैशाली शिंदे,ओबीसी तालुकाध्यक्ष विश्वनाथ राऊत,कार्याध्यक्ष नरेंद्र जाधव, महेंद्र राळेभात,युवक अध्यक्ष प्रशांत राळेभात, संभाजी ब्रिगेड चे कुंडल राळेभात, जुबेर शेख,गणेश हगवणे,रमेश आजबे, हरिभाऊ आजबे,शहराध्यक्ष वसिम सय्यद,युवक कार्याध्यक्ष सागर कोल्हे,कार्याध्यक्ष रामहरी गोपाळघरे, सामाजिक कार्यकर्ते अभय शिंगवी,काकासाहेब कोल्हे, प्रविण उगले,माजी नगराध्यक्ष निखिल घायतडक,सचिन शिंदे,मनोज भोरे, सरपंच बाळासाहेब खैरे,बापूसाहेब कार्ले,सुनिल उबाळे,बाबासाहेब मगर, अमर चाऊस,संदीप गायकवाड,नय्युमभाई शेख,अक्षय गागरे,अक्षय खिळे,भाऊसाहेब कसरे, अशोक पठाडे,रावसाहेब जाधव, बिलाल शेख,चरण कदम, प्रशांत वारे,दत्ता डिसले आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना अभिनेत्री सोनाली कुलकर्णी म्हणाल्या,भव्य-दिव्य दहिहंडी उत्सवात मला बोलाविले आहे.या बद्दल आमदार रोहित दादा पवार व मित्र परिवाराचे आभार मानते.जामखेड मध्ये एवढी ग्लॅमरस दहीहंडी कधीच कल्पना केली नव्हती. गेल्यावर्षी नवरात्र उत्सवाच्या सुरुवातीला कार्यक्रमासाठी जामखेड येथे आले होते.त्याच्यानंतर आज आले, वर्षभरात जामखेड येथे कायापालट झालेला दिसतोय. पूर्णपणे कर्जत/ जामखेड चे रुप बदलेले दिसतेय.

यावेळी बोलताना आमदार रोहित पवार म्हणाले की ,दहीहंडी स्पर्धेच्या माध्यमातून आपली संस्कृती परंपरा पुढच्या पिढीपर्यंत घेऊन जाण्याचा प्रयत्न मित्र परिवाराच्या मदतीने करणार आहेत.

यावेळी स्पर्धेत फलटण येथील जय हनुमान गोविंदा पथकाने ५ थर लावून दहीहंडी फोडली आणि पहिलं बक्षिस पटकावलं. यावेळी साईरत्न गोविंदा पथक (छत्रपती संभाजीनगर), शिवसाम्राज्य गोविंदा पथक (करमाळा) आणि ठाण्यातील मराठा गोविंद पथक यांनीही सहभाग घेतला.




दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज
बीड । परभणी । छत्रपती संभाजीनगर । जालना । लातूर । धाराशिव । हिंगोली । नांदेड । नगर
# मराठवाडा पत्र






# स्व. विनायकराव मेटे यांना 'उत्कृष्ट संसदपटू' पुरस्कार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान

▸ पत्नी डॉ. ज्योती मेटे यांनी स्वीकारला पुरस्कार ; स्व. विनायकराव मेटे साहेबांनी समाजासाठी खूप काम केलं : मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे
▸ पुरस्कारासाठी स्व. विनायकराव मेटे याच्या नावाची घोषणा होताच सभागृहात टाळ्यांचा कडकडाट

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रकूल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे देण्यात येणारा महाराष्ट्र विधानपरिषद 'उत्कृष्ट संसदपटू' पुरस्कार शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय मा.आ. विनायकराव मेटे यांना जाहीर झाला मंगळवार ३ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी ३.३० वाजता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या शुभहस्ते विधान भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला लोकनेते स्व. विनायकराव मेटे यांना मृत्यू पश्चात हा पुरस्कार देण्यात आला त्यांच्या पत्नी डॉ. ज्योती मेटे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. या पुरस्काराची घोषणा होताच मंचावर उपस्थित मान्यवरांनी आणि सभागृहातील उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

विधिमंडळाच्या कामकाजातील नियमित सहभाग, विधिमंडळाच्या नियमांचे काटेकोर पालन, विधिमंडळात उपस्थित करावयाच्या विषयांचे आकलन, उपस्थिती, विषय मांडताना वापरलेले ज्ञान, कौशल्य, निवडलेले मुद्दे, वक्तृत्व शैली, दर्जेदार उत्कृष्ट भाषणे या सर्व गोष्टी पडताळून पाहून पुरस्कारांसाठी नेमलेल्या तज्ज्ञ समितीकडून या



### ▸ स्व. विनायकराव मेटे साहेबांनी समाजासाठी खूप काम केलं : मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे

**लोकनेते स्व. विनायकराव मेटे साहेब यांना देखील आपण आज उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार प्रदान केला आहे. त्यांच्या पत्नी डॉ. ज्योती मेटे ह्या या ठिकाणी पुरस्कार स्वीकारण्यासाठी उपस्थित आहेत. त्यांनी त्यांच्या जीवनाम ध्ये समाजासाठी खूप काम केलं परंतु दुर्दैवाने ते आज आपल्यात नाहीत. त्यांची आठवण आपल्या सोबत आहे आणि त्यांनी केलेले काम कायम आहे.**

(उर्वरित पान २ वर)

## थोडक्यात...

### रोहीदास महामंडळाची कर्ज योजना

**बीड । प्रतिनिधी**

विशेष घटक योजना २० भांडवल योजना १६ मुदती कर्ज योजना ३२ लघुऋण वित्त योजना ५० महिला अधिकारीता योजना २ महिला समृद्धी योजना ४१ शैक्षणिक कर्ज योजना २० महामंडळाच्या वरील शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार हा चर्मकार समाजातील (चांभार, मोची, ढोर, व होलार) असावा. तसेच त्याने यापूर्वी महामंडळाच्या व इतर कुठल्याही शासकीय योजनेचा लाभ घेतलेला नसावा, लाभ घेऊ इच्छीणाऱ्या अर्जदाराने आवश्यकतेनुसार कागदपत्रांची पूर्ण पूर्तता करून कर्ज प्रस्ताव प्रत्येकी तीन प्रतीत टंकलिखित किंवा छापील स्वरूपात सर्व दस्ताऐवज स्वत: प्रमाणित (Selfattested) करुनच जिल्हा कार्यालयात सादर करावेत वरील योजनेचे कर्ज प्रस्ताव महामंडळाच्या विहित नमुन्यातील छायांकित प्रत केलेले अर्ज ही बातमी प्रसिध्द झाल्यापासून पुढील ०१ महिन्यापर्यंत कार्यालयीन वेळेत (सकाळी १०.०० ते ५.३० पर्यंत) जिल्हा कार्यालय, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, तळमजला, नगर रोड, बीड ४३११२२ दूरध्वनी क्रमांक ०२४४२-२९९१८७ या ठिकाणी कर्ज प्रस्ताव स्वत: प्रत्यक्ष अर्जदाराकडून स्वीकारले जातील याची नोंद घ्यावी. टीप विशेष घटक व बीज भांडवल योजनेअंतर्गत महामंडळात यापूर्वी दाखल केले सर्व जुने कर्ज प्रस्ताव रद्द समजण्यात येतील.

### कैद्यांसाठी कायदा माहिती कार्यक्रम

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक ०३ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता किमान समान कार्यक्रमाअंतर्गत आनंद एल. यावलकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्या मार्गदर्शनाखाली ''कैदी व न्यायबंदी यांचे अधिकार, शिक्षा कमी करण्यासाठीच्या तरतूदी व जामीनाच्या तरतूदी'' या विषयावर जिल्हा कारागृह, बीड येथे जनजागृती कार्यक्रम ाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची प्रस्तावना करताना जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव, श्री. सोनी यांनी कैद्यांना त्यांच्या मदतीसाठी असलेल्या गरीब कैद्यांच्या समिती बद्दल सविस्तर माहिती दिली व त्यासाठी असलेले पात्रता व निकष यांबाबत सांगितले.

### गेवराई शहरात बैल पोळा सण उत्साहात साजरा

शिवराज पवार यांनी वेशीवर बांधलेले तोरण तोडून बैल पोळा फोडला



**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहरात बैल पोळा सण उत्साहात साजरा करण्यात आला. युवा नेते शिवराज बाळराजे पवार यांनी हनुमान मंदिराला प्रदक्षिणा घालून ,वेशीवर फुलांच्या माळांनी बांधलेले तोरण तोडून पोळा फोडला. शहरातील शेतकर्यांनी वेशीतून सजवलेल्या बैलांना वाजतगाजत मिरवून आणले. दोन दिवसापासून पावसाची संततधार सुरू असल्याने, पोळा सणाच्या उत्साहात भर पडल्याचे दिसून आले.पोळा पहाण्यासाठी नागरीकांनी गर्दी केली होती. सोमवार ता. २ सप्टेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता गेवराई शहरातील शेतकरी, दरवर्षी प्रमाणे शास्त्री चौकात पोळा सण साजरा करण्यासाठी एकत्र आले होते. गेवराई चे पाटील शिवराज बाळराजे पवार यांनी सजवलेल्या बैलांची मिरवणूक काढून ग्रामदैवतांची पुजा केली. त्यांनी वेशीवर बांधलेले तोरण तोडून बैल पोळा फोडला. त्यानंतर, शेतकर्यांनी सजवलेल्या बैलांची वेशीतून मिरवणूक काढली. ढोल ताशा , हलगीच्या तालाने शास्त्री चौकातला परिसर दणाणून गेला. गेल्या दोन दिवसांपासून गेवराई तालुक्यात संततधार पाऊस पडत असून, पोळा उत्साहात पार पडल्याचे चित्र दिसून आले. नागरीकांनी पोळा पाहण्यासाठी गर्दी केली होती. पोलिस निरीक्षक प्रविणकुमार बांगर, पोलिस अधिकारी संतोष जंजाळ, डॉ. भुतेकर , यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांची तगडा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## माजलगावात २८ कोटी रूपयांच्या स्त्री रूग्णालयास मान्यता

- सहा महिण्याच्या कालावधीत उभारणार इमारत
- आमदार प्रकाश सोळंके यांची माहिती

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगावात २८ कोटी ६८ लक्ष रूपयांचे साठ खाटांचे स्त्री रूग्णालयास मान्यता मिळाली असुन सहा महिण्याच्या कालावधीत रूग्णालयाची इमारत उभारण्यात येणार असल्याची माहिती आमदार प्रकाश सोळंके यांनी दिली आहे.

शहरामध्ये स्त्री रूग्णालय नसल्याने महिलांना इतर ठिकाणी उपचारासाठी जावे लागत होते. यामध्ये महिलांची मोठी परेशानी होती. त्यामुळे माजलगाव शहरात स्वतंत्र स्त्री रूग्णालय उभारण्यात यावे अशी मागणी होती. याची दखल घेत आ. प्रकाश सोळंके यांनी या रूग्णालयाबाबत शासनस्तरावर पाठपुरावा केला होता. त्यामुळे रूग्णालयाची मागणी शासनाच्या



विचाराधीन होती. दि. ३ सप्टेंबर २०२४ रोजी याबाबतचा शासन निर्णय निर्गमीत झाला असुन साठ खाटांचे स्त्री रूग्णालय मुख्य इमारत बांधकामास २८ कोटी ६८ लक्ष रूपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. त्यामुळे माजलगाव शहरात स्त्री रूग्णालय उभारण्यात येणार असुन सहा महिण्यांम ध्ये स्त्री रूग्णालयाची इमारत उभारण्यात येणार असल्याची माहिती आ. प्रकाश सोळंके यांनी दिली आहे.

## रेल्वे पुलाखालच्या पाण्याचे व्यवस्था करा; अन्यथा जलसमाधी आंदोलन करू : शिवराम राऊत

शिवश्री कृषिमंडळ हिवरसिंगा यांच्यावतीने उप अभियंता (निर्माण) सेन्ट्रल रेल्वे, नगर यांना शिरूर तहसिलदार यांच्या मार्फत इशारा निवेदन

**शिरूर । प्रतिनिधी**

हिवरसिंगा-मलकाचीवाडी रोडवरील रेल्वे वळण रस्त्याच्या पुलाखाली प्रत्येक पावसाळ्यात ४/५फुट साठुन दुधाळ वस्ती,सानप वस्ती,चव्हाण वस्ती,शिंदे वस्ती,तलाव परिसरासह मलकाचीवाडी-ढोरकरवाडी चा मुख्य रस्ता बंद होणे हि कायमचीच समस्या विद्यार्थी,शेतकरी,अबाल-वद्ध,रूग्ण यांच्यासाठी कायम चीच झाली आहे.यासाठी अनेकवेळा रेल्वे प्रशासनाला कळवलेले आहे.परंतू अद्यापही रेल्वे प्रशासनाने साठलेल्या पाण्याचा निचरा करण्यासाठी कायमस्वरुपी



व्यवस्था करण्यासाठी शिवश्री कृषि मंडळाचे सर्व सदस्य शेतकरी,ग्रामस्थ यांच्या वतीने जिल्हाधिकारी बीड,नि. उपजिल्हाधिकारी,यांना कळवले तसेच आज पिडीत ग्रामस्थांच्या वतीने खेडकर(तहसिलदार शिरूर,) यांची श्री.,शिवराम राऊत,रामेश्वर पांडुळे,विजय शिंदे यांनी भेट घेऊन मा.उपमुख्य अभियंता निर्माण सेंन्ट्रल रेल्वे, पु.अहिल्या नगर यांना तहसिल प्रशासना मार्फत पत्र दिले असुन साठलेल्या पाण्याचा कायम स्वरूपी निचरा होण्यासाठी ठोस उपाययोजना करावी अन्यथा साठलेल्या पाण्यातच शिवश्री कृषिमंडळ हिवरसिंगा व पीडीत शेतकरी जलसमाधी आंदोलन उभारतील यावेळी तहसिलदार श्री.खेडकर यांनी रेल्वे विभागाचे इंजि.धांडोरे यांना संपर्क करून शेतक-यांची समस्या कळवली आहे.पुढील काही दिवसांत साठलेल्या पाण्याचा निचरा करुन पाणी साठणार नाही अशी व्यवस्था करण्यात येईल असे धांडोरे यांनी कळवले आहे. यावेळी उपस्थित शेकडो शेतक-यांनी काही दिवसांची मुदत देत समस्या नाही सुटल्यास जलसम ाधी आंदोलन करण्यावर ठाम असतील असे राऊत यांनी रेल्वे प्रशासनाला इशारा दिला आहे.

## राज्य प्रशासकीय सेवेतील उपजिल्हाधिकारी संवर्ग सेवाज्येष्ठता वाद सर्वोच्च न्यायालयात निकाली

उपजिल्हाधिकारी यांच्या पदोन्नत्या होऊन महसूल विभागातील प्रशासकीय शिथीलता दूर होणार

**बीड । प्रतिनिधी**

राज्य प्रशासकीय सेवेतील उपजिल्हाधिकारी संवर्ग सेवाज्येष्ठता वाद सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी निकाली काढीत काही पदोन्नत उपजिल्हाधिकाऱ्यांच्या गटाने दाखल केलेली विशेष अनुमती याचिका सुनावनी घेत फेटाळून लावली. तसेच सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा ८ ऑगस्टचा निकाल कायम ठेवत उपजिल्हाधिकारी सेवा जेष्ठता यादीचा वाद अंतिमरित्या संपुष्टात आला आहे. या निकालाचा परीणाम म्हणून आता त्यामुळे उपजिल्हाधिकारी यांच्या पदोन्नत्या होऊन महसूल विभागातील प्रशासकीय शिथीलता दूर होणार आहे.

उपजिल्हाधिकारी संवर्गामध्ये उपजिल्हाधिकारी पदावर येण्याचे दोन मार्ग आहेत. एक प्रत्यक्ष एमपीएससी द्वारे परीक्षा देऊन सरळसेवा म्हणून येतात व दुसरे हे तहसीलदार या पदावरून पदोन्नती घेऊन येतात.

उपजिल्हाधिकारी संवर्गात ६५ टक्के पदोन्नत तहसीलदार हे उपजिल्हाधिकारी असले पाहिजे तर ३५ टक्के हे प्रत्यक्ष सरळसेवा उपजिल्हाधिकारी असले पाहिजे असे प्रमाण ठरलेले आहे. परंतु गेल्या काही वर्षात नियमाप्रमाणे ठरलेले हे प्रमाण न पाळता जास्तीचे तहसीलदार संवर्गातून उपजिल्हाधिकारी पदोन्नत केले गेले आणि त्यामुळे सरळसेवा उपजिल्हाधिकारी यांच्यावर व त्यांच्या पदोन्नतीवर यामुळे गंभीर परिणाम झाला. यामुळे उपजिल्हाधिकारी यांची पदोन्नती होऊन अप्पर जिल्हाधिकारी होण्याचा कालावधी हा २० ते २२ वर्षे एवढा वाढला होता.

**माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे उपजिल्हाधिकारी सेवाज्येष्ठता यादी वाद संपुष्टात येईल. आता कमी वर्षात पदोन्नती होईल अशी अपेक्षा आहे. – श्री. अविनाश पाठक, जिल्हाधिकारी बीड .**

... (उर्वरित पान २ वर)

## प्रौढ बीसीजी लसीकरण मोहिम उद्घाटन सोहळा; नाळवंडी येथील शिबिरात ज्येष्ठांचा सहभाग





**बीड । प्रतिनिधी**

आज दिनांक ०३/०९/२०२४ रोजी प्रा आ केंद्र नाळवंडी येथे १८ वर्षावरील नागरिकांसाठीच्या लसीकरण मोहिमेचा शुभारंभ जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ गंडाळ सर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. सचिन शेकडे सर. जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी. डॉ. रौफ सर जिल्हा अतिरिक्त आरोग्य

.... (उर्वरित पान २ वर)

### ग्रामीण आरोग्य अबाधित डॉ उल्हास गंडाळ

**बीड जिल्ह्यातील ग्रामीण जनतेचे आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी आम्ही कायम दक्ष आहोत. कर्मचारी अधिकारी हे कार्य तत्पर राहून ग्रामीण आरोग्य जपण्याचे काम करतील . नाळवंडी हे केंद्र कायम जनतेच्या आरोग्याची काळजी घेईल या साठी च्या सूचना त्यांनी केल्या.**

# पिक विमा पुर्वसुचनेसाठी दिलेला टोल फ्री 14447 लागतच नाही शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळणार कशी?

मुख्यमंत्री महोदयांच्या ई पिक पाहणी अट रद्द घोषणेचं काय झालं ; सरसकट नुकसान भरपाई द्यावी : डॉ.गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत सोयाबीन व खरीप कांदा व ईतर पिकांचे नुकसान झालेल्या विमाधारक शेतक-यांनी घटना घडल्यापासुन ७२ तासांच्या आत विमा कंपनीस पिकांच्या नुकसानीबाबत सुचित करावे असे आवाहन तालुका कृषी अधिकारी बी.आर.गंडे यांनी केले आहे.प्ले स्टोअर वरून क्राप इन्शुरन्स अप डाऊनलोड करून तक्रार करावी तसेच १४४४७ या टोल फ्री क्रम ांकावरून पिक विमा कंपनीकडे तक्रार



करावी असे म्हटले आहे.मात्र दिलेला टोल फ्री क्रमांक लागत नसल्यामुळे नेमकं सरकारला आणि पिक विमा कंपन्यांना शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याची नियत आहे का केवळ दिशाभूल करण्याचा प्रयत्न आहे असा संतप्त सवाल शेतकऱ्यांनी केला आहे.

बीड जिल्ह्यात पावसाने धुम ाकूळ घातला असुन सरासरी ९२ मिलिमीटरची पावसाची नोंद झालेली असुन ९ तालुक्यात आणि तब्बल ६१ महसूल मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाली असुन ३४ महसूल मंडळात १०० मिलिमीटर पेक्षा आधिक पावसाची नोंद झालेली आहे.

बीड तालुक्यातील लिंबागणेश महसूल मंडळात आठवडाभरात ३ वेळा अतिवृष्टी झाल्याची नोंद आहे. टोल फ्री क्रमांक लागत नसल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी केल्या असुन याची शहानिशा केली असता यात तथ्य आढळुन आल्यामुळे शेतकरी हवालदिल झाले असुन कैफियत कोणाकडे मांडायची हा प्रश्न पडला आहे.

मुख्यमंत्री महोदयांच्या ई पिक पाहणी अट रद्द घोषणेचं काय झालं? सरसकट नुकसान भरपाई द्यावी: डॉ.गणेश ढवळे

ई पिक पाहणीची किचकट अट रद्द करण्यात यावी अशी शेतकऱ्यांची प्रमुख मागणी असताना मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी परळी येथील कृषी महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ई पिक पाहणीअट रद्द केल्याची घोषणा केली होती.मात्र अजुन याचा शासन आदेश निघालेला नाही त्यामुळे मुख्यमंत्री महोदयांच्या घोषणेचं काय झालं? असा प्रश्न शेतकऱ्यांकडून विचारला जात आहे.बीड पावसाने हाहाकार मांडला असुन सर्वच तालुक्यांनी पावसाची वार्षिक सरासरी ओलांडली आहे.

अतिवृष्टीमुळे खरीप हंगाम ातील सोयाबीन,कांद्यासह ईतर पिके वाया गेली असुन प्रशासनाने पंचनामे करून सरसकट नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com